सकाळ

**Sakal Marathi -** 10 July 2017

# येऊरच्या पाड्यांत विजेचा लपंडाव!

## ठाण्यात प्राणी, सर्प आणि कीटकांमुळे आदिवासींचे जीवन धोक्यात

**सकाळ वृत्तसेवा**

ठाणे, ता. ९ : पावसामुळे नागरिक सुखावले असले, तरी ठाण्यातील येऊर परिसरातील आदिवासी पाड्यांत वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. पावसाची सुरुवात झाल्यानंतर वीजपुरवठा खंडित होऊन दुसऱ्या दिवशीच वीज पाहण्याची वेळ येथील नागरिकांवर येऊन ठेपली आहे. जून महिन्यात असे प्रसंग दररोज घडत असून, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर येथील प्राणी, सर्प आणि कीटकांमुळे आदिवासींचे जीवनही धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे, वीज गेल्यानंतर येथील मोबाईल टॉवरही बंद होऊन संपर्काचा मार्गही बंद पडत असल्यामुळे मदतीसाठीही कोणीच नसल्यामुळे येऊरच्या परिसरातील वीजपुरवठा तत्काळ सुरू करण्याची मागणी येथील रहिवाशांनी केली आहे.



मुसळधार पाऊस, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा आला की, शहरातील वीज जाण्याचे प्रमाण वाढते. जूनमध्ये शहरातील विविध भागांत वारंवार वीज जात होती; मात्र ती पुन्हा सुरू होत होती. येऊर येथील आदिवासी गावात एकदा वीज गेली की, पुढील दिवशीच येते. विशेष म्हणजे या प्रकरणी तक्रार केल्यानंतर कर्मचारी नाहीत. या भागात रात्री कोणतीच सेवा देता येत नाहीत, अशी उत्तरे महावितरणच्या हेल्पलाईन आणि कार्यालयातून मिळत असल्यामुळे नागरिकांनाही नेमके काय करायचे, असा प्रश्न पडत आहे. येऊर भाग हा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा भाग असून, या जंगलात अनेक हिंस्र प्राणी, विषारी साप आणि कीटकही आढळून येतात. त्यामुळे त्यांच्यापासून बचाव करण्यासाठी वीज हा एकमेव पर्याय येथील नागरिकांना आहे. रात्री फिरताना अचानक वीज गेल्यास कोठून हल्ला झाला तर नेमके काय करायचे, असा प्रश्न येथील नागरिकांना पडला आहे.

> “ येऊर परिसरात अनेक मोठे बंगले, हॉटेल, रिसॉर्ट असून तेथे जनरेटरच्या साह्याने वीजपुरवठा होतो; परंतु आदिवासी पाड्यात अद्याप वीजपुरवठाच पोहचलेला नाही. काही भागांत वीज असली तरी ती पावसाळ्यात बराच काळ खंडित असते. दिवसातून सुमारे आठ ते दहा तासांपर्यंत वीज नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. महावितरणकडून वारंवार संपर्क केल्यानंतरही प्रतिसाद मिळत नसल्यामुळे नागरिकांना वीजपुरवठ्यापासून वंचित राहावे लागते.
>
> प्रकाश कदम, येऊर रहिवासी

---

> ठाणे शहरापासून अवघ्या काही अंतरावर असला तरी येऊर हा अत्यंत दुर्गम भाग आहे. अनेक घरे लांब असून, त्यांना वीजपुरवठा नसल्यामुळे आदिवासी अंधारात असून, विजेअभावी त्यांच्या जीवाला येथील प्राणी, सर्प आणि कीटकांचा धोका निर्माण होतो. अनेक विषारी साप या भागात असून, त्यांच्यावरील उपचारासाठी ठाणे सरकारी रुग्णालयाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. वीज बंद झाल्यावर येथील मोबाईल टॉवरही काही वेळेत बंद होत असून फोनवरून संपर्क करणेही अवघड होते.
>
> – अपूर्वा अगवण, क्रायसिस फाऊंडेशन